**० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील ०३ को.प.बं योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.**

**महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ**

**छत्रपती संभाजीनगर - ४३१००१**

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ निर्णय क्र. को.प.बं/प्र.मा./प्र.क्र. ६७४७ / २८००

दिनांक : २९ डिसेंबर, २०२३.

**संदर्भ :**

१) अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे, कार्यालयाचे पत्र क्र. प्रशा-१ /५९६७ दिनांक २२.११.२०२३

२) शासन, जलसंपदा विभाग, परिपत्रक क्र. संकिर्ण-२००६ / (२६९/२००६) / जसंअ, मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक : २५.०४.२०१९.

**प्रस्तावना :**

अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे, यांचे संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये, ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील ०३ को.प.बं योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबतचे प्रस्ताव महामंडळास सादर करण्यात आले आहेत.

त्याअनुषंगाने प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार, अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील ०३ को.प.बं योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची बाब महामंडळाच्या विचाराधीन होती.

**महामंडळ निर्णय :**

० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील ०३ को.प.बं योजनांच्या, मृद व जलसंधारण विभागाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचीवर आधारित कामाप्रित्यर्थ रु.१३६३५९६२/- (रुपये एक कोटी छत्तीस लक्ष पस्तीस हजार नऊशे बासष्ट फक्त) व अनुषंगिक खर्च रु.६८१७९९/- (रुपये सहा लक्ष एक्याऐंशी हजार सातशे नव्याण्णव फक्त) अशा एकूण अंदाजित रु.१४३१७७६१/- (रुपये एक कोटी त्रेचाळीस लक्ष सतरा हजार सातशे एकसष्ट फक्त) किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सोबत परिशिष्ट-०१ मध्ये योजनांची यादी व गोषवारा जोडण्यात आलेला आहे.

सदर योजनांच्या प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकानुसार एकूण साठवण क्षमता ८०.८८ स.घ.मी. असून, नियोजित एकूण सिंचन क्षमता ३२ हेक्टर इतकी आहे.

सदर योजनांच्या कामावरील खर्च, हा महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडून उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या निधीतून केला जाईल.

तसेच सदर योजनेस खालील अटीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) शासन निर्णय दिनांक ३१ जुलै, २००० अन्वये या योजनेसाठी लाभधारकांची पाणी वापर संस्था स्थापन करणे अनिवार्य राहील. पाणी वापर संस्थेमार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी हस्तांतर करण्यास सहमती असल्याबाबत संबंधीत ग्रामसभेच्या ठरावाद्वारे मान्यता घेणे आवश्यक आहे.

२) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक : नागरी-२०११ / प्र.क्र.१९२ / निधी / जल-१, दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१२ अन्वये विहित तरतूदींचे पालन करण्यात यावे.

(क्र.मा.प.....)

३) प्रचलित शासन निर्णय, नियम, मार्गदर्शक सूचना व विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन योजनेच्या कामाची निविदा कार्यवाही करावी व प्राप्त निविदा मंजुरीसाठी महामंडळास सादर करावी.

४) कामे पूर्ण करुन योजना देखभाल दुरुस्तीसाठी नियमानुसार हस्तांतरीत करावी.

५) प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रीया प्रथम प्राधान्याने पुर्ण करण्यात यावी.

सदर योजनेच्या कामावरील खर्च खालील लेखाशिर्षातून भागविण्यात यावा.

लेखाशिर्ष :

मागणी क्रमांक - झेडएच - ५
प्रधान लेखा शिर्ष ४४०२, मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च,
१९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांतील गुंतवणुका,
(०१) भागभंडवली अंशदान (०१) (०१) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाला भाग भांडवली अंशदान,
(४४०२ २८२३), ३२, अंशदाने (दत्तमत) (योजनांतर्गत)

सदर महामंडळ निर्णय, कार्यकारी समितीच्या दिनांक ०४.१२.२०२३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील विषय क्र. ०३ अन्वये पारित ठरावाच्या अनुषंगाने, महामंडळाचे पत्र क्र.मजसंम/तांशा-३ / का.स.बै.०४.१२.२३ कार्यवृत्त/ २४४८/ सह / २०२३, दिनांक : ११.१२.२०२३ अन्वये, निर्गमित केलेल्या कार्यवृत्तानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सोबत :- परिशिष्ट - ०१

(सु. पां. कुशिरे)
व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ
छत्रपती संभाजीनगर

**प्रतिलिपी - परिशिष्ट - ०१ सह.**

१) मा. अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई - ४०० ०३२.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे -४४०००३.
सोबत - वरीलप्रमाणे अंदाजपत्रक.
५) प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नाशिक
६) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अहमदनगर
७) महामंडळ कार्यालय, लेखा शाखा क्र.१
८) महामंडळ कार्यालय-संग्रहार्थ.

परिशिष्ट - ०१

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ निर्णय क्र. को.प.बं/प्र.मा./प्र.क्र. ६७४७ / २८०० दिनांक : २९ डिसेंबर, २०२३. चे सहपत्र

० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील ०३ को.प.बं योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.

| अ.क्र | योजनेचा प्रकार | योजनेचे नाव | तालुका | जिल्हा | कामा प्रित्य खर्च (रुपये) | अनुषंगिक खर्च (रुपये) | एकुण अंदाजित किंमत (रुपये) | साठवण क्षमता (स.घ.मी.) | जलसाठा किंमत/ स.घ.मी. | प्रचलित मापदंड/ स.घ.मी. | लाभ व्यय गणोत्तर | आर्थिक परतावा दर | सिंचन क्षमता (हे.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | को. प.ब | राळेगणसिध्दी (कोहिनी मळा) | पारनेर | अहमदनगर | ४५६५७३५ | २२८२८७ | ४७९४०२२ | २७.२ | १७६२५१ | १७८८१० | १.१९ | १८.४२ | ११ |
| २ | को. प.ब | पिंपळनेर (कॅनाल जवळ) | पारनेर | अहमदनगर | ५४३८८७५ | २७१९४४ | ५७१०८१९ | ३२.१७ | १७७५२० | १७८८१० | १.१९ | १८.५६ | १३ |
| ३ | को. प.ब | राळेगणसिध्दी (औटी मळा) | पारनेर | अहमदनगर | ३६३१३५२ | १८१५६८ | ३८१२९२० | २१.५१ | १७७२६३ | १७८८१० | १.०९ | १७.८७ | ८ |
| | | एकुण | ३ | योजना | १३६३५९६२ | ६८१७९९ | १४३१७७६१ | ८१ | | | | | ३२ |

(सु. पां. कुशिरे)
व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ
छत्रपती संभाजीनगर